नियमीत दिवाणी दावा क्रमांक १२९/२०२३
निशाणी क्र. २६

**<u>प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र. १ सुशांत हिरामण वाडीले यांचा अतिरिक्त सरतपास प्रतिवादीतर्फे विधीज्ञ एस.एन.गोरे यांचे मार्फत शपथेवर सुरु.</u>**

१. माझ्या सरतपासणीचे शपथपत्रातील मजकुर माझे विधीज्ञांनी मला वाचुन व समजावुन सांगितला आहे, त्यातील मजकुर सत्य सत्य व बरोबर आहे. मला प्रस्तुत प्रकरणात साक्षीकामी बँकेने अधिकृत केले आहे व तसा बँकेचा ठराव झाले बाबतचे पत्राची सत्य प्रत मी अभिलेखावर दाखल केली आहे. त्यावर बँकेचे प्रमुख मॅनेजर यांची सही आहे. त्यातील मजकुर सत्य व बरोबर आहे. सदर **दस्तास नि.क्र. ३३** देण्यात येतो.

२. मयत तुळशीराम यांचे लॉकर उघडण्यास आक्षेप घेणारा अर्ज ज्ञानदेव तुळशीराम मगर यांनी बँकेत दिला होता. सदर अर्जाची साक्षांकित प्रत मी दाखल केली आहे. मुळ प्रत माझ्या सोबत आहे. सदर **दस्तास नि.क्र. ३४** देण्यात आला.

**<u>प्रतिवादीचे साक्षीदार क्र.१ यांचा उलटतपास वादीतर्फे विधीज्ञ पी.जी.आहेर यांचे मार्फत सुरु.</u>**

३. मी सन २०१८ पासुन बँकेमध्ये विशेष वसुली अधिकारी म्हणुन कार्यरत आहे. मला संपुर्ण दस्ताची माहिती आहे. हे म्हणणे खरे आहे की ठरावावर डेप्युटी मॅनेजर जनरल यांची सही नाही, साक्षीदार स्वत:हुन सांगतात की प्रमुख मॅनेजर यांची सही आहे.

४. मयत तुळशीराम मगर यांनी आमच्या बँकेत लॉकर उघडले होते. सदर लॉकरचे भाडे ते भरत होते. बँकेत लॉकर उघडत असताना संबंधीत अर्जदाराचे शपथपत्र, नॉमिनी बाबतची माहिती, लॉकरचा फॉर्म, इंडेक्स कार्ड फॉर्म, लॉकरचा भाडेकरार नामा, एक अधिकार पत्र इ. दस्त तयार करुन घेतले जातात. मी न्यायालयाने मागणी केल्यास सदर दस्ताची प्रमाणित प्रती अभिलेखावर सादर करण्यास तयार आहे.

**उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

श्रवणोत्तर स्विकृत,

सही/-
**(पंकज रा. फुलारी)**
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर., राहाता.

राहाता
दिनांक –२७.०१.२०२६